पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३११८** **दि. २८ /०९ /२०१९**

## कोरेगाव पार्क पोलिस स्टेशन

## फरार आरोपीस अटक

कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन गु.र.न ११५/२०१४ भादवि कलम ४६१,३८०,३४ मधील फरार आरोपी नामे सानु ऊर्फ शहानवाज अस्लम सिद्दीकी. रा.बिजनोर उत्तर प्रदेश. याने कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन येथील सन २०१४ साली स्वराज पान टपरी फोडुन १,७२,०००/- रु चा माल चोरुन नेला याबाबत गुन्हा दाखल झाला असुन सदरचा आरोपी हा सन २०१४ पासुन उत्तर प्रदेश येथे निघुन गेला होता,. त्यास आज रोजी पोशि रियाज शेख यांना बातमी मिळालेवरुन त्यास पोहवा शिंदे पोहवा ठाकुर,पोना सांळुके, पोन गायकवाड, पोशि शेख, पोशि सांवत यांनी मा. पोलीस निरीक्षक सेाा गुन्हे श्री गणेश माने यांचे मार्गदर्शनाखाली घोरपडी गाव मदारी वस्ती येथुन ताब्यात घेण्यात आलेले आहे,. सदरचा गुन्हा हा इसम नामे सानु ऊर्फ शहानवाज अस्लम सिद्दीकी,मेहराज अस्लम सिद्दीकी,सादाब अस्लम सिद्दीकी,ताहीर रहेमान सिद्दीकी यांनी केल्याचे निष्पन्न झाले आहे,. सदरचे आरोपी हे मुळ उत्तर प्रदेशचे असुन ते पुण्यामध्ये ढवळेवस्ती, घोरपडी. पुणे येथे राहत असुन मजुरीची कामे करत आहेत.

सदरची कारवाई मा.शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप-आयुक्त सो, परिमंडळ-२ पुणे शहर, मा. रविंद्र रसाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त,लष्कर विभाग पुणे शहर, मा.प्रमोद पत्की,वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, श्री गणेश माने पोलीस निरीक्षक(गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील सहा.पो.निरी किरण लोंढे. पोहवा दिनेश शिंदे, संदिप ठाकुर, पोना विनोद सांळुके, गणेश गायकवाड, पोशि निशीकांत सांवत, रियाज शेख, मपोशि ज्योती राऊत, यांनी करवाई केली.

दाखल गुन्हयाचा पुढील तपास कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन करीत आहेत